# अमेरिकेचा अनोळखी चेहरा

एका  फादर्स डे ला माझ्या एका सहकाऱ्याने - राजने सर्वांना विचारलं, ‘तुम्ही आपल्या वडिलाना कार्ड पाठवलंत का?’ टोनी सोडून आम्ही सर्वानी होकारार्थी उत्तरं दिली. ‘नोप’ कम्पुटरकडे बघतच, कामातून डोकं बाहेर न काढता टोनी म्हणाला.

‘काय ही इथली माणसं? ह्यांना साधं कार्ड पाठवायलाही वेळ नसतो’ अशा अर्थाने मान हलवत, राजने माझ्याकडे पाहिलं. माझ्या मनात आलं, इथे जो तो स्वत:तच गुंतलेला... नाती खुंटीवर ठेवून... कोणालाच कोणासाठी वेळ नाही!

त्यानंतर थोड्याच दिवसात टोनीने अचानक सुटी घेतली. आमचा मॅनेजर माझ्या क्युबिकलमध्ये आला. तो म्हणाला, ‘टोनीचे आजोबा वारले, तो फ्युनरलची व्यवस्था करतो आहे. व्युइंग उद्या आहे. इथे सहकाऱ्यांतर्फे फुलं पाठवण्याचा प्रघात आहे. पण मला वाटतं फुलं पाठवण्यापेक्षा आपण पैसे पाठवू म्हणजे त्याला मदत होईल.’ मला काहीच कळलं नाही. नागपूरला आमचा नोकर आजोबांच्या मयताला पैसे मागायचा. टोनीला तर चांगली नोकरी आहे. याला कशाला मदत हवी? माझ्या चेहऱ्याकडे पाहून मॅनेजरने खुलासा केला. टोनीच्या घरी त्याचे कुटुंब (मुलं-बायको) , याशिवाय त्याचे आईवडील आणि आजोबा राहत होते. बिचारा सगळ्यांची काळजी घेतो. गेला आठवडाभर तो आजोबांच्या सेवेत गुंतला होता. आता फ्युनरलला ८-९ हजार डॉलर्स खर्च येणार. आपण ५० जणांनी फुले पाठवण्याऐवजी पैसे दिले तर थोडीफार मदत होईल.

फादर्स डे ला कार्ड पाठवून प्रेम व्यक्त करायची टोनीला गरज का वाटली नाही  याचं असं अनपेक्षित उत्तर मला मिळालं. मोठ्या शहरांमधील छोटी (न्युक्लीअर) कुटुंबच आपल्यापैकी बहुतेकजण पहातात त्यामुळे अमेरिकन जीवनाची ही बाजू आपल्याला दिसत नाही. मी टोनीची गोष्ट घरी सांगितल्यावर माझा नवरा म्हणतो ‘अगं, इटालियन लोक खूप फॅमिली ओरिएन्टेड असतात.’ नंतर ‘My big fat greek wedding’ सिनेमामुळे ग्रीक लोक किती ‘फॅमिली ओरिएन्टेड’ असतात ते कळलं. नंतर, अमेरिकेत स्थानांतरीत झालेल्या लोकांपैकी, चीनी, कोरियन, मेक्सिकन, पोलिश अशी ‘फॅमिली ओरिएन्टेड’ जगाची ओळख होत होत शेवटी “कोण फॅमिली ओरिएन्टेड नसतं?” हा प्रश्न मला पडायला लागला.

सरकारी आकडेवारीनुसार एकूण सर्व (३.९ कोटी) वृद्धांपैकी ९१ टक्के जनता घरीच रहाते. (वृध्दाची व्याख्या ६५ वर्षाच्या वरील व्यक्ती!) ६५ पर्यन्त बहुतेक सर्व नोकरी करत असतात. अमेरिकेत ७५ वर्षांच्या खालील वृद्धांपैकी फक्त १.१% लोक नर्सिंग होम मध्ये

रहातात. (त्यापेक्षा मोठ्या वयोगटात अर्थातच प्रमाण जास्त आहे.). घरी रहाणाऱ्यामध्ये ७२% जोडीदाराबरोबर रहातात, १९ टक्के (म्हणजे ७४ लाख) वृद्धांना मुलं, मुली, किंवा नातवंडं सांभाळतात. काळजी घेणाऱ्यामध्ये आईवडिलांची काळजी घेणाऱ्या मुलींचं प्रमाण जास्त आहे. आपल्या मुलांकडे नातवंडाबरोबर राहणारे, तीन पिढ्या एकत्र नांदणारे १९ लाख वृद्ध आहेत. २०१० च्या या सरकारी गणनेनंतर अमेरिकेच्या आर्थिक घसरणीमुळे एकत्र राहणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. ज्यांना शक्य होतं ती बरीच तरुण मंडळी घरभाड्याचा खर्च वाचविण्यासाठी घरी परत गेली आहेत.

माणसाची कुटुंबवत्सलता ही स्वाभाविक गोष्ट आहे. परिस्थितीने किंवा नोकरी निमित्त दूर गेलेल्या अमेरिकनांना थँक्सगिविंग किंवा क्रिसमसला घरी जाण्याची ओढ लागते. एकट्या राहणाऱ्या वृद्धांना मायबाप सरकार मदत करतेच - तो एक स्वतंत्र लेखाचा विषय होईल, पण टोनीसारखी जी माणसं वृध्द आईवडिलांची किंवा आजी आजोबांची काळजी घेतात, त्यांनाही सरकार मदत करते. वृद्धांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींना (त्यांना केअरटेकर म्हणतात) नोकरी, घर आणि ही जबाबदारी सांभाळताना स्वत:कडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. कधीकधी या केअरटेकरच्या व्यक्तिगत आयुष्यात प्रचंड तणाव येऊ लागतो. त्यांना विश्रांती मिळावी, ब्रेक मिळावा म्हणून प्रत्येक स्टेटच्या सरकारी योजना असतात.

व्हिजिटिंग हेल्थ सपोर्टिव सर्विसेस ही न्यू जर्सीमधील अशीच एक संस्था. समाजकार्याची आवड असणाऱ्या व्यक्ती येथे व्हॉलेन्टीअर म्हणून नावं नोंदवतात. त्यांची पोलीस चौकशी (गुन्हेगार नाहीत अशी खात्री झाल्यावर) केल्यानंतर सरकारतर्फे त्यांना ट्रेनिंग देण्यात येतं. पेशंट बरोबर असताना काय करावं व काय करू नये, काय बोलायचं, मुख्य म्हणजे काय बोलू नये, इमर्जन्सी कशी हाताळायची, त्यांच्या व्यक्तिगत जीवनात कितपत दखल घ्यायची, प्राथमिक मदत कशी द्यायची, या सर्वाचे नियम व कायदे शिकवले जातात. उदाहरणार्थ वृद्ध व्यक्तीला विल करून ठेवणं चांगलं कसं आहे, नाही केल्यास इस्टेट सरकारजमा कशी होते हे सहजपणे सांगायचे पण तुमचं विल आहे की नाही, किंवा कोणाला त्यातून इस्टेट मिळणार आहे असे प्रश्न विचारायचे नाहीत.

ही परीक्षा पास झाल्यावर त्या ‘व्हिजिटिंग केअरटेकर’ (व्ही.सी.) ला क्लाएन्ट नेमून दिला जातो. व दोघांचं टाईम टेबल बांधून दिलं जातं. आठवड्यातून ४-६ तास व्ही.सी.नी क्लाएन्टच्या घरी जाऊन त्याची काळजी घ्यायची, तेव्हढा वेळ केअरटेकरला मोकळीक मिळते.

अमेरिकेत २६% सजाण जनता कुठे न् कुठे व्हॉलेन्टीअर म्हणून काम करते. या देशात, अगदी वयाच्या १० व्या वर्षापासून मुलं, मुली थोडेतरी तास समाजकार्यासाठी देतात.

उच्च दर्जाच्या कॉलेजमध्ये ॲडमिशनसाठी अशा मुलांना प्राधान्य देण्यात येतं. समाजासाठी वेळ देणाऱ्या त्या ६.४ कोटी (६४,२५२,०००) लोकांपैकी मी एक. त्यामुळे मी करायची त्यात विशेष काही नाही. पण मी हे काम करायला घेतल्यामुळे अमेरिकेचं लोभस अंतरंग जवळून पहायला मिळालं.

माझ्या पहिल्या क्लाएन्टच्या घरची गोष्ट. त्यादिवशी, हंटरडन कौंटीमधील एका अंथरुणाला खिळलेल्या आजींना ५ तास सांभाळायचं होतं. या भागात इतकी झाडी आहे, की जंगलात घर आहे असं वाटतं. व्ही.सी. म्हणून मी त्यांच्या घरी गेले. अमेरिकेत लोकांना परक्या व्यक्तीने ‘आजी’ ‘आजोबा’ म्हटलेले आवडत नाही, पण त्यांची प्रायव्हसी जपण्यासाठी मी इथे आजी म्हणून उल्लेख करतेय. आजीचं काम आटोपून मी त्यांच्याजवळ बसले होते. दुपारचे ३ वाजले. आजींचा १६-१७ वर्षाचा धटिंगण दिसणारा नातू घरी आला. सोबत ४-५ मित्रमैत्रिणीचं टोळकं होतं. आजीच्या खोलीत डोकावून ‘हाऊ यु डुइंग’ असं घाईत म्हणत, उत्तराची वाट न् पहाता तो धडाधडा बेसमेंटमध्ये गेला. माझा पहिलाच दिवस, जंगलातलं घर, आणि माझ्या दुप्पट आकाराची ती मुलं पाहून मला जरा दडपल्यासारखं झालं. आजीनी ते ओळखलं. ‘तुझ्यासारख्याला कोणाच्या घरी पाठवण्यापूर्वी, सरकार बॅकग्राउंड चेक करून घेते हे तुला माहीत आहे नं? तुझ्यासारखंच आमचंही?’ आजी हसत म्हणाली. तो नातू चेन-सॉ, दोर व टूलबॉक्स घेऊन आपल्या टोळक्यासकट घरामागच्या जंगलात अदृश्य झाला. संध्याकाळी सून घरी आली, नोव्हेंबरचे दिवस असल्याने अंधार लवकर झाला होता.
‘क्रिस कुठेय?’ सुनेनं विचारलं. आजीने जंगलाकडे बोट दाखवलं.
‘एकटा होता?’ ती.  आजीने मानेनेच नाही म्हटलं
‘कधी येणार म्हणाला?’ ती.
‘विचारलं नाही मी, बरोबर मुलं होती त्याच्या’ आजी.
‘तो मागच्या जंगलात गेला, मुलांना घेऊन गेला, तरी विचारलं नाही? यु कुड नॉट कीप ॲन आय ऑन हिम?’ सून वैतागली. ‘तो तिथे जाऊन दारू पीत बसला, तर नवरा घरी आल्यावर कटकट करेल. थोडा दम घालायचा त्याला. टीनेजर आहेत, बाहेर अंधार झालाय…’ बडबडत ती किचनकडे वळली.
‘त्याने काही केलंय का? केल्यावर रागवावं. ही एज अ गुड किड’ आजी माझ्याजवळ हळूच पुटपुटल्या.

थोड्या वेळाने बाहेरून मुलांचा गलका, ट्रकचा आवाज, इतरही आवाज येऊ लागले. मुलं खाली काय गोंधळ घालत असतील ते खिडकीतून बघण्याचंही धाडस मला झालं नाही.

‘नॅना, लुक आउट फ्रोम युवर विंडो’. नातवाने खालून आवाज दिला. ‘नॅना’ हे आजीसाठी लाडके संबोधन! ‘नानी’ इतकंच गोड वाटलं मला. आजीने मला बाहेरचा दिवा लावायला सांगितला. तिच्या दुसऱ्या मजल्यावरच्या त्या खिडकीतून पाईनच्या झाडाचं टोक दिसत होतं. आजीचा चेहरा आनंदाने फुलला.

दरवर्षीप्रमाणे बाहेरच्या खोलीत क्रिसमस ट्री उभं केलं तर आजीला बघता येणार नाही म्हणून नातवाने हा खटाटोप केला होता. मित्रांच्या मदतीने जंगलातून योग्य उंचीचं झाड कापून, ते ट्रकवर चढवून घरापर्यंत आणलं. व खिडकीजवळ उभं केलं होतं. आजीने सुनेला बोलावलं. त्या सुंदर झाडाकडे दोघीही डोळे विस्फारून पहात राहिल्या. ‘ट्रस्ट हिम’ आजी सुनेला म्हणाली. खरं म्हणजे तो धडा माझ्यासाठीही होता.

दुसऱ्या एका आजींची गम्मत म्हणजे त्या व्यवसायाने पोलीस इन्स्पेक्टर होत्या. त्यामुळे त वरून ताकभात ओळखण्याचे ट्रेनिंग २५-३० वर्षे मिळाले होते. आजीना पॅरॅलेसीस झाला होता. मी तिथे बसले असताना दार वाजलं. मी उठायला लागले तशा त्या म्हणतात, आमची नात आली असेल, जाईल ती लगेच वरती. ‘मी पाहू?’ मी. ‘नको, ज्या पद्धतीने दार आपटलं त्यावरून तीच आहे.’ आजींची हेरगिरी सुरु झाली. दोन लोकांची पावलं वाजताहेत, म्हणजे बरोबर बॉयफ्रेंड असेल. तूच सांग, तरूण मुलगी! त्याला बेडरूम मध्ये नेणं बरोबर आहे का? नंतरचे आवाज ऐकत, बघ, मी म्हटलं नव्हतं? असं माझ्याकडे बघत होत्या. थोड्या वेळात नात खाली आली.

‘कोण आहे तुझ्याबरोबर?’ आजी. ‘नन ऑफ युवर बिझीनेस’ ती ओरडली. मी तिथे आहे लक्षात आल्यावर मला म्हणते, ‘हिच्या भोचकपणाला मी कंटाळले आहे. सतत सगळ्या गोष्टीत नाक खुपसत असते. पोलीसपणा जात नाही तिचा. म्हणून तर वृद्धाश्रमातून हाकलून दिलं तिला चार महिन्यात.’ म्हणत ती गेली. ‘बघ, कशी बोलते!’ आजी म्हणाल्या. ‘टीनेजर असेच गरम डोक्याचे असतात, जाऊ द्या. ’ मी. त्यांनी सांगितलं, त्या वृद्धाश्रमात गेल्या होत्या. तिथल्या एका मदतनीसाने त्यांचे चांगले ड्रेसेस चोरले. त्यांना उठता येत नव्हतं, पण त्यांनी त्याची तक्रार केली. तर दुसऱ्या दिवशी रात्री त्याने कोणाला तरी पाठवून त्याना बेदम मारलं. आजीनी आपल्या ऑफिसची म्हणजे पोलिसांची मदत घेतली. वृद्धाश्रमाची चौकशी सुरु झाली, तेव्हा ही बला नको म्हणून काहीतरी कारण काढून तिथल्या व्यवस्थापकांनी त्याना घरी पाठवलं. चार वर्षे त्या घरीच आहेत. “मुलगा-सून सगळं करतात. फक्त ही बया सतत डाफरत असते.” त्या म्हणाल्या. खरं म्हणजे तिला पाहिल्यावर मला चित्र पूर्ण झाल्यासारखं वाटलं. सगळंच गोडीगुलाबीने चालायचं असं नाही. भांड्याला भांडं लागणारच.

त्यानंतर मला कधी आजोबांचे डायपर बदलणारा नातू भेटला, तर् कधी मैत्रिणीसाठी आणलेली भेटवस्तू (आपलं गुपित) आजीला विश्वासात घेऊन तिच्या खोलीत क्रिसमसपर्यंत लपवणारा नातू भेटायचा.

हे काम मी करायला लागले त्यालाही इतिहास आहे. माझे वडील भारतात आजारी होते, आणि मुलगा आजारी असल्याने मी जाऊ शकले नाही, त्यांची सेवा करता आली नाही म्हणून खंत वाटत होती. माझी मैत्रीण हॉली अटकिन्स म्हणाली, ‘इथे व्हिजिटिंग हेल्थ चा प्रोग्राम आहे, वडिलांची सेवा करता आली नाही, पण इतरांची करता येईल.’ आणि खरंच, त्या प्रत्येकामध्ये मला वडिलांची सेवा केल्याचे समाधान मिळत गेलं. हॉलीची आई फोर्ट मायर्सला रहायची, हॉली क्लीअरवाटरला. आईवडिलाजवळ गेलं तर सर्वांनाच सोयीचं होईल म्हणून हॉली फोर्ट मायर्सला रहायला गेली. मुलाना सांभाळायला त्यांची मदत होत होती. आणि त्यांच्या डॉक्टरच्या फेऱ्यासाठी हॉली आणि तिच्या कुटुंबाची मदत व्हायची. वडील गेल्यावर ७ वर्ष आई हॉलीकडे राहिली. तिला चर्चमध्ये नेणं, तिची शुश्रुषा हॉली तिचा नवरा व मुले आनंदाने करीत होती. त्यांचीच नव्हे तर वडिलांच्या आत्याची, सेवाही हॉलीचा मुलगा क्लेटन करीत होता. मुले आजीआजोबांजवळ वाढतात, व नंतर त्यांची सेवा करतात. ‘माझ्या मुलांना जे प्रेम मिळालं त्याची भरपाई कुठल्याच सेवेने होणार नाही’ असं हॉली म्हणते.



क्लेटन आणि त्याची आजी

अशा कितीतरी कुटुंबात तीन पिढ्या एकत्र असतात. मिस्त्कुकी, मेन स्टेट मध्ये रहाणारी केनी, यांचीही गोष्ट तशीच. त्यांचे फोटो दिले आहेत.




केनी व कुटुंब

कामाच्या निमित्ताने खूप एकत्र कुटुंब भेटली त्याच्या खूप आधी मला एक आगळेवेगळे कुटुंब भेटलं होतं. १९८३ सालची गोष्ट. एडिसन न्यूजर्सी मध्ये आम्ही रहायला आलो, माझी शेजारीण हेलन म्हणाली, 'ती डॅडची काळजी घेतेय.' 'आणि माम?' मी. 'ते माझे वडील नाहीत सासरे आहेत. ऐंशी वर्षांचे ! आजारी आहेत. मी त्यांना सांभाळते. आम्ही दोघंच असतो.'

पुढे कळले, ही अनाथ मुलगी, एका इटालियन माणसाच्या, खरं म्हणजे त्याच्या कुटुंबाच्या प्रेमात पडली. लग्न झाल्यावर आईवडील मिळाल्याचा तिला आनंद झाला. एकत्र कुटुंबात आपलं हरवलेलं बालपण तिने मिळवलं. खूप लाडकी होती सगळ्यांची. काही वर्षांनी तिच्या कामावर, केमिकल लॅबमध्ये काम करतांना स्फोट झाला, आणि तिचे दोन्ही हात भाजले. जखमा बऱ्या झाल्या, पण कोडासारखे पांढरे डाग राहिले. नवरा विचित्र वागू लागला. एक दिवस म्हणाला, 'तशा हाताच्या बाईबरोबर मी संसार करू शकत नाही, मला डिव्होर्स हवाय.' त्याच्या आईवडिलांनी समजवण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. वडील म्हणाले, 'डिव्होर्स हवा

असेल तर घे, पण घर तुला सोडावं लागेल. हेलनला आम्ही मुलगी मानलं आहे, ती इथेच रहाणार.’ तो गेला. त्यानंतर सासू आजारी पडली तेव्हा चार वर्षे हेलनने मुलीसारखी सासूची सेवा केली. आणि नंतर सासऱ्यांची शेवटपर्यंत सेवा केली.

आंबटगोड अनुभव घेत एकत्र नांदणाऱ्या माणसांनी भरलेला हा अमेरिकेचा अनोळखी चेहरा – कदाचित भारतासारखा दिसणारा आहे म्हणून असेल, पण मला खूप भावला.पाश्चात्यांचे अनुकरण करायचेच असेल तर सेवा करणारे मुलं, नातवंडं, आणि त्या कुटुंबांना मदत करणारे सेवाभावी नागरिक यांचे करावे असं मला वाटतं.

(Reference: US govt. statistics 2010)

**नीलिमा कुलकर्णी,**
रेस्टन, VA, USA

(पूर्वप्रकाशित - महाअनुभव ओगस्ट २०१९)